श्री व्यंकटेश महाविद्यालयामध्ये व्याख्यानाचे आयोजन

"आजच्या या जागतिकीकरणाच्या युगामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रचंड महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा कल व्यवसायिक अभ्यासक्रमाकडे वाढला असून एम.बी.ए. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अनेक विद्यार्थी प्रयत्न करत असतात. त्यामुळे येथेही आपणास प्रचंड स्पर्धा पाहण्यास मिळते. म्हणून विद्यार्थ्यांनी एम.बी.ए. सी.ई.टी.चे सखोल ज्ञान प्राप्त करून ही परीक्षा दिल्यास ते एम.बी.ए.अभ्यासक्रमासाठी प्रवेशित होऊ शकतात. असे प्रतिपादन व्ही. वाय. बडवे यांनी केले. ते व्यंकटेश महाविद्यालय व डि.के.टी.ई. संस्था यांच्यामधील सामंजस्य कराराअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानामध्ये बोलत होते. बी.कॉम. व बी.बी.ए. बी.कॉम. आय. टी. च्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी एम.बी.ए . सी. इ. टी. ची पूर्वतयारी या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन हा एक स्पर्धात्मक अभ्यासक्रम आहे. एम.बी.ए. प्रवेश घेण्यासाठी प्रथम प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्येक आहे. एम.बी.ए. प्रवेश सामान्य परीक्षेसाठीची पात्रता, एमबीए सी.ई.टीचा अभ्यासक्रम, सीईटी च्या टॉपिक नुसार चर्चा अन् परीक्षेची तयारी कशी करावी, याबाबत प्राध्यापक व्ही. वाय . बडवे आणि प्राध्यापक एच. एस. दायमा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी. एन. कांबळे यांनी विद्यार्थ्यांना एमबीए सीईटीची तयारी करताना महाविद्यालयकडून आवश्यक ती शैक्षणिक मदत करण्याची ग्वाही दिली. तसेच परीक्षेची पूर्व तयारी करताना टाइम मॅनेजमेंट कसे करावयाचे याचे मारदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक बी.बी.ए. विभागप्रमुख पी.पी. दाइंगडे यांनी केले. तर सूत्रसंचालन डॉ. एस. आर. ठाकर यांनी केले. आभार व्ही. ए. कुलकर्णी यांनी मांडले. कार्यक्रमाप्रसंगी बी. बी.ए. विभागाचे प्रा.बी. एन. नदाफ, प्रा. एस.एस. साळोखे उपस्थित होते. बी कॉम, बी. बी.ए. आणि बी.कॉम. आय.टी. च्या तृतीय वर्षाचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

